नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ६० | Issue - 60 | वार गुरुवार दि. १७ जुलै २०२५ | Blow- Thursday Date 17 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com





## जमिनींचे तुकडे प्रतिबंध अधिनियमात सुधारणांसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन

### शासन निर्णय जारी; समितीला १५ दिवसांत शासनास अहवाल सादर करण्याचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: राज्य सरकारने 'महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७' मध्ये सुधारणा करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून, अधिनियमातील तरतुदींविरुद्ध झालेल्या जमिनींच्या तुकड्यांचे नियमितीकरण करण्याची प्रक्रिया सुलभ करण्यावर ही समिती लक्ष केंद्रित करणार आहे. महसूल व वन विभागाने यासंदर्भात शासन निर्णय जारी केला आहे.

शेत जमिनींचे लहान तुकडे होण्यापासून रोखण्यासाठी आणि किफायतशीर शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी १९४७ चा अधिनियम लागू करण्यात आला होता. मात्र, अनेक वर्षांपासून या अधिनियमामुळे उद्भवणाऱ्या अडचणी आणि जमिनींच्या अनधिकृत तुकड्यांच्या नियमितीकरणाची मागणी जोर धरत होती. सध्या सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनात विधानसभेत यासंबंधीची लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. त्यावेळी, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून १५ दिवसांत याबाबत (एसओपी) मानक कार्यप्रणाली तयार करण्याचे आश्वासन दिले होते.





अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत अपर मुख्य सचिव (नगरविकास-१), प्रधान सचिव (ग्रामविकास), जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, संचालक (नगर रचना), सह/उप सचिव (विधि व न्याय विभाग) यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, महाराष्ट्र जमीन महसूल न्यायाधिकरण येथील सदस्य (प्रशासकीय) राजेंद्र क्षीरसागर आणि सेवानिवृत्त संचालक (नगर रचना) एन. आर. शेंडे हे निमंत्रित सदस्य म्हणून मार्गदर्शन करतील.

नागरी क्षेत्र वगळल्यामुळे होणाऱ्या जमिनीच्या हस्तांतरणामुळे त्या भागातील विकासाचे नियोजनबद्ध हस्तांतरण व विकासाची कार्यपद्धती ठरवणे. अधिनियमाच्या कलम ८ ब मधील तरतुदींच्या अनुषंगाने नियमितीकरणाची प्रक्रिया कशी सुलभ करता येईल आणि नियमितीकरणाची व्यवहार्यता तपासणे. कलम ९ (३) नुसार तुकड्यांच्या नियमितीकरणाची कार्यपद्धती निश्चित करणे. नोंदणीकृत दस्ताने झालेल्या तुकड्यांचे नियमितीकरण आणि त्यांच्या हस्तांतरणाची अधिकार अभिलेखात नोंद घेण्यासाठी मानक कार्यप्रणाली ठरवणे. अनोंदणीकृत खरेदी व्यवहारांमध्ये खरेदीदारांचे नाव अधिकार अभिलेखात घेण्यासाठी कायद्यात सुधारणा आवश्यक असल्यास त्या सुचवणे. नोंदणीकृत खरेदी व्यवहारांचे नियमितीकरण मोहिम स्वरूपात घेणे. अनोंदणीकृत खरेदी व्यवहारामुळे झालेल्या तुकड्यांचे नियमितीकरण आणि त्यानंतरच्या नोंदणी प्रक्रियेची कार्यपद्धती ठरवणे.

**समिती १५ दिवसात अहवाल देणार**

समितीला १५ दिवसांत शासनास अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे राज्यातील जमिनींचे तुकडे पाडण्यासंबंधीच्या अनेक वर्षांच्या जटिल प्रश्नावर तोडगा निघणार आहे. जमिनीच्या नोंदी अधिक स्पष्ट होतील आणि नागरिकांना होणारा त्रास कमी होईल. अधिवेशन संपण्यापूर्वी अध्यादेश निघेल असे सांगितले होते, असं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

---

### शिंदे बाजूला असतानाच उद्धव यांच्याकडून 'ठाकरी बाण'

### भाजपला सुद्धा शालजोडे लगावले

## दानवे सोन्याचा चमचा घेऊन आले नाहीत, पण भरल्या ताटात प्रतारणा सुद्धा केली नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची टर्म संपल्याने त्यांना आज (१६ जुलै) निरोप देण्यात आला. यावेळी चांगलीच राजकीय टोलेबाजी रंगली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची विधान परिषदेत अंबादास दानवे यांना निरोप देताना भाषणांमध्ये चांगली टोलेबाजी रंगली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१९ पर्यंत आम्हाला विरोधी बाकावर येण्यासाठी कोणताही स्कोप नसल्याचे सांगत उद्धव ठाकरे यांना मात्र सोबत येण्याची ऑफर दिली. यामुळे राजकीय भूवया उंचावल्या. उद्धव ठाकरे यांनी निरोपाच्या भाषणात भाजप आणि शिंदेंवर चांगलीच तोफ डागली. एकनाथ शिंदे बाजूला असल्याने उद्धव ठाकरे यांनी शिंदे यांना चांगलेच डिवचण्याचा प्रयत्न केला. भाजपला सुद्धा शालजोडे लगावले.



उद्धव ठाकरे यावेळी बोलताना म्हणाले की आंबादास दानवे त्यांची टर्म पूर्ण करत आहेत. निवृत्त होत आहेत असं म्हणणार नाही. यावेळी बोलताना फडणवीस यांच्या मी पुन्हा येईन वक्तव्याचा दाखला देत उद्धव ठाकरे यांनी चिमटा काढला. ते म्हणाले की दानवे तुम्ही सुद्धा म्हटलं पाहिजे मी पुन्हा येईन. ठाकरे पुढे म्हणाले की काहीजण आज कौतुक करत असले तरी आंबादास यांना विरोधी पक्ष मिळते केल्यानंतर तेव्हा यांचे चेहरे कसे झाले माहित होते. ते पुढे म्हणाले की भाजपच्या तालमीत तयार झालेल्या अंबादास तुम्ही दिल्याबद्दल तुमचे आम्ही आभार मी मानतो. मात्र, तुम्ही माझे नेले त्यामुळे तुम्ही माझे आभार मानणार का? अशी विचारणा त्यांनी यावेळी केली.


**अंबादास यांनी भरल्या ताटाशी कधीच प्रतारणा केली नाही**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपलं मनोगत व्यक्त करताना अंबादास दानवे सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आले नसल्याचं वक्तव्य केलं. याच वक्तव्याचा दाखला देत उद्धव ठाकरे यांनी टोला लगावला. ते म्हणाले की काही लोक म्हणाले की ते सोन्याचा चमचा घेऊन आले नाहीत. मात्र काही लोक असे आहेत जे भरलेल्या ताटातून उधळून गेले आहेत. पद मिळाले नाही म्हणून दुसऱ्याच्या रेस्टॉरंटमध्ये गेल्याचं म्हणत एक प्रकारे एकनाथ शिंदे यांना टोला लगावला. अंबादास यांनी भरल्या ताटाशी कधीच प्रतारणा केली नाही. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी मृणालताई गोरे यांच्या कार्याचा सुद्धा दाखला दिला. उद्धव ठाकरे म्हणाले की मृणालताई गोरे या कधीही पदासाठी डगमगल्या नाहीत. उद्धव ठाकरे यांनी आबाचा दानवे यांचे जोरदार कौतुक केलं. माझ्याकडे कधीही कोणते पद न मागायला आलेला शिवसैनिक म्हणजे अंबादास दानवे असल्याचे ते म्हणाले. पावसाळा असल्याने कोणी कधी इकडे तिकडे उड्या मारू शकतो असं म्हणत त्यांनी शिवसेना शिंदे गटावरती जोरदार टीका केली.

---

## आकाश प्राइम एअर डिफेन्सची चाचणी यशस्वी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : ऑपरेशन सिंदूरच्या दरम्यान चीन, पाकिस्तान आणि तुर्की या तीन देशांनी भारताविरुद्ध भूमिका घेतली होती. आता या तीन देशांना धडकी भरवणारी चाचणी भारतानं केली आहे. भारताच्या आकाश प्राइम एअर डिफेन्सची लडाखमध्ये यशस्वी चाचणी घेण्यात आली आहे. ही चाचणी १५ हजार फूट ऊंचीवर घेण्यात आली. यामुळं दुश्मन देश भाराताविरोधात पाऊल टाकताना पहिल्यांदा विचार करतील. भारताविरुद्ध पाऊल उचललं तर त्यांना नुकसान होऊ शकतं.

संरक्षण अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार परिक्षण सुरु असताना जमिनीवरुन हवेत मारा करणाऱ्या मिसाईलनं अत्यंत ऊंच क्षेत्रात वेगानं जाणाऱ्या विमानांवर दोन वेळा थेट प्रहार केला. आकाश प्राइम सिस्टीम भारतीय सेनेत आकाश एअर डिफेन्स सिस्टीमची तिसऱ्या आणि चौथ्या रेजिमेंटची स्थापना करेल. या स्सिटीमनं ऑपरेशन सिंदूरच्या दरम्यान चीनच्या विमानांना आणि तुर्कीच्या ड्रोनच्या हल्लयांना निष्प्रभ केलं होतं. आकाश प्राइम एअर डिफेन्सची चाचणी डीआरडीओ आणि इंडियन आर्मीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एकत्र येत केलं.

या यशस्वी चाचणीनंतर भारतीय सैन्याच्या हवाई संरक्षण नेटवर्कचा भाग म्हणून आकाश प्राइम डिफेन्स सिस्टीमला सामील करुन घेण्याच्या दिशेनं महत्त्वाचं पाऊल आहे. अधिकाऱ्यांनी म्हटलं की आकाश एअर डिफेन्स सिस्टीमची तिसरी आणि चौथी रेजिमेंट आकाश प्राईमचा वापर करण्यासाठी बनवली जाऊ शकते. आकाश प्राइम भारताच्या आत्मनिर्भर संरक्षण उत्पादनं, प्रामुखं हवाई संरक्षण यासारख्या क्षेत्रातील व्यापक प्रयत्नांचा भाग आहे. संरक्षण दलाच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार स्वदेशी निर्मित आणि विकसित आकाश एअर डिफेन्स सिस्टीम जमिनीवरुन हवेत मारा करणाऱ्या मिसाईल एअर डिफेन्स सिस्टीमनं पश्चिमेकडून सीमा आणि जम्मू काश्मीरमधील नियंत्रण रेषेवर पाकिस्तानकडून झालेल्या हल्लयांना नाकाम करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. हवाई हल्लयांना प्रतिबंध करण्यात आणि त्यापासून बचाव करण्यासाठी आकाश प्राइम एअर डिफेन्स सिस्टीमची स्थापना करण्यात आली आहे.

---

## महाराष्ट्रात प्लॅस्टिक फुलांवर बंदी येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : सणा-सुदीला, विविध उत्सवात सजावटीसाठी बाजारात येणाऱ्या प्लॅस्टिक फुलांमुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान होत आहे. त्यामुळे, कृत्रिम फुले बंद व्हावीत व फुल उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा यासाठी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये बैठक लावून तातडीने निर्णय घ्यावा अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तासगाव कवठेमहांकाळचे आमदार रोहित पाटील यांनी निवेदनाद्वारे केली. या मागणीला १०५ आमदारांच्या सहीसह पाठिंबा पत्र जोडत फुल उत्पादक शेतकऱ्यांसाठी हा विषय महत्त्वाचा असल्याचे आमदार रोहित पवार यांनी म्हटले. याबाबत मुख्यमंत्र्यांनी लवकरच फलोत्पादन मंत्री भरत गोगावले व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्याचे आश्वासन दिले आहे. विशेष म्हणजे मंत्री गोगवले यांनी देखील शासन कृत्रिम फुलांवर बंदी आणेल, असे म्हटले आहे.

**१०५ आमदारांच्या सह्यांचे पत्र; मुख्यमंत्र्यांची संमती, लवकरच होणार निर्णय**

आ.रोहित पाटील यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्यात सर्रासपणे प्लॅस्टिक फुलांचा वापर प्रचंड प्रमाणात झाला आहे. त्यामुळे शेतीतील विविध प्रकारच्या फुलांची लागवड करून सदरची फुले बाजारात प्लॅस्टिकच्या फुलांमुळे अत्यल्प दरात विक्री होत असल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. प्लॅस्टिक पिशवी वापरावर ज्याप्रमाणे शासनाने बंदी आणली त्याप्रमाणे या प्लॅस्टिकच्या फुलांवर कायमस्वरूपी निर्बंध घातल्यास त्याचा शेतकरी वर्गास मोठा फायदा होणार आहे. द्राक्षपिक व इतर फळपिकांना पर्यायी व्यापारी पिक म्हणून फुलशेती केली जाते. या फुलशेतीसाठी लागणारी औषधे, मजुरी व ट्रान्सपोर्ट खर्च पाहता शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्यामुळे प्लॅस्टिक फुलांवर कायमस्वरूपी निर्बंध आणून फुलशेती करणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय देणेसाठी बैठक आयोजित करणे गरजेचे असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

दरम्यान रोहित पाटील यांनी प्लॅस्टिक फुलावर बंदी घालण्याच्या केलेल्या मागणीला विधिमंडळातील सत्ताधारी व विरोधी पक्षातील तब्बल १०५ आमदारांनी स्वाक्षरी देऊन पाठिंबा दर्शवला आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर पण त्याचबरोबर नागरिकांच्या आरोग्यावर व पर्यावरणावर प्लास्टिक फुलांमुळे गंभीर परिणाम होत आहे. ही महत्त्वाची बाब आमदार रोहित पाटील यांनी लक्षामध्ये आणून दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फलोत्पादन मंत्री भरत गोगावले व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत या विषयावर तातडीने बैठक घेण्याचे आश्वस्त केले आहे.

शासन कृत्रिम फुलांवर बंदी आणेल, आम्ही सीएमसोबत मिटींग असून त्यात हे ठरले आहे. कृत्रिम फुलांमुळे शेतकरी वर्गाला फटका बसतो पण त्याचवेळी रासायनिक कलर वापरणेही यामुळे थांबेल, असे भरत गोगावले यांनी सांगितले आहे. आमदार महेश शिंदे यांनी सभागृहात लक्षवेधी उपस्थित करत हा मुद्दा चर्चेला आणला होता. त्यावर, हा निर्णय घेण्यात आला आहे.

# संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अग्रेसर - अण्णाभाऊ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भाऊ साठे पहिल्यांदा कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या कम्युनिस्ट विचारसरणीने प्रभावित झाले. १९४४ मध्ये दत्ता गव्हाणकर आणि अमर शेख या शाहिरांच्या सोबत त्यांनी लालबावटा कला पथक स्थापन केले. लावण्या, पोवाडे व पथनाट्ये या माध्यमातून त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलन, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ व गोवा मुक्ती आंदोलनात जनजागृती करण्यासाठी मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच सिमाभागातील अनेक ठिकाणी शाहीरांनी आपल्या 'लालबावटा' कलापथकातर्फे संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला. याद्वारे त्यांनी अनेक सरकारी निर्णयांना आव्हान दिले होते. ते १९४० च्या दशकामध्ये कार्यरत राहिले आणि तेविया अब्राम्स यांच्यानुसार भारतातील साम्यवादाच्या आधी स्वातंत्र्याच्या नंतरची '१९५० च्या दशकातील सर्वात रोमांचक नाटकीय घटना' होती. भारतीय स्वातंत्र्यानंतर उच्चवर्णीयांचे भारतावरील शासन त्यांना मान्य नव्हते म्हणून त्यांनी १६ ऑगस्ट १९४७ रोजी मुंबई येथे वीस हजार लोकांचा मोर्चा काढला आणि त्या मोर्च्यातील घोषणा होती, ये आझादी झूठी है, देश कि जनता भूखी है! इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन मध्येही ते एक महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व होते, जी भारतीय कम्युनिस्ट पक्षाची एक सांस्कृतिक शाखा होती आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये ज्याने भाषिक विभागातून वेगळे मराठी भाषी राज्य (बॉम्बे राज्य) निर्माण करण्याची मागणी केली होती. या चळवळीत त्यांची अग्रसर भूमीका होती.

अण्णाभाऊ साठे म्हणून ओळखले जाणारे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते. साठे हे मार्क्सवादी-आंबेडकरवादी प्रवृत्तीचे होते, सुरुवातीला त्यांच्यावर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव होता. दलित साहित्याचे संस्थापक म्हणून त्यांना श्रेय दिले जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत देखील त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान हे महत्त्वपूर्ण मानले जाते. आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी व अभ्यासक हे त्यांच्या या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करतांना दिसतात. संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि शाहीर गव्हाणकर यांनी केले. मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच सीमा भागातील अनेक ठिकाणी शाहिरांनी आपल्या लालबावटा कलापथकाचे कार्यक्रम सादर केले.


प्र. के. अत्रे, कॉ. श्री. अ. डांगे, एसेम, शाहीर अमर शेख, शाहीर गव्हाणकर यांच्या संपर्कात आल्याने अण्णाभाऊंचे लेखन अधिक खुलत गेले. महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज, क्रांतीवीर लहुजी साळवे यांच्या प्रेरणेने त्यांना साहित्यात अधिष्ठान लाभले. अण्णाभाऊंनी मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळविले असले तरी, त्यांचा मूळपिंड शाहिराचा आणि कविचा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे, मार्क्सवाद भाकरीचा प्रश्न सोडवील, पण माणुस म्हणुन जगण्याचा प्रश्न शिल्क राहतोच. मला भाकरी पेक्षा इज्जत आणि स्वाभिमान प्यारा आहे या विचाराने अण्णाभाऊ भारावून गेले. हा स्वाभिमान त्यांनी निर्माण केलेल्या पात्रातून आपले अस्तित्व दाखवू लागला. त्यांनी आपल्या उभ्या आयुष्यात दोन गोष्टींचा तिटकारा केला. एक म्हणजे श्रीमंतांकडुन होणारे गरीबांचे शोषण नि-अस्पृश्य बांधवांची होणारी धार्मिक, सामाजिक पिळवणुक या बाबींवर आपल्या लेखणीने सतत प्रहार केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आणि गेल्या ५० वर्षात झालेल्या साहित्य, संस्कृतीच्या जडण-घडणीत मराठी साहित्य आणि साहित्यीकांचे योगदान त्यात प्रामुख्याने अण्णाभाऊंचे लक्षणीय ठरले.

भाऊ साठेंच्या पोवाडा आणि लावणी यांसारख्या लोककथात्मक कथा शैलींच्या वापराने लोकांमध्ये ते लोकप्रिय बनले व त्यांचे कार्य अनेक समुदायांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केलेल्या 'फकिरा' मध्ये, साठेंनी आपल्या समुदायाला पूर्ण भुखमरीपासून वाचवण्यासाठी ग्रामीण रूढिवादी प्रणाली आणि ब्रिटिश शासनाच्या विरुद्ध विद्रोह करणाऱ्या नायक फकिराला चित्रित केले. नायक आणि त्याच्या समुदायाला नंतर ब्रिटिश अधिकारी द्वारे अटक आणि छळ दिला जातो आणि अखेरीस फकिराला फाशी देऊन ठार मारले जाते.



**- प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

भाऊ साठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकींना अनुसरत दलित कार्याकडे वळले आणि दलित व कामगारांच्या जीवनातील अनुभवांना प्रकट करण्यासाठी त्यांच्या कथांचा वापर केला. १९५८ मध्ये बॉम्बेमध्ये स्थापन केलेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनात आपल्या उद्घाटन भाषणात त्यांनी म्हटले की, पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित व कामगार लोकांच्या तळहातावर तरलेली आहे यातून त्यांनी जागतिक संरचनांमध्ये दलित आणि कामगार वर्गांचे महत्त्व स्पष्ट केले. या काळातील बहुतांश दलित लेखकांच्या विपरित, साठेंचे कार्य मार्क्सवादाच्या प्रभावाखाली होते. त्यांनी म्हटले आहे की, दलित लेखकांना सध्याच्या सांसारिक व हिंदू अत्याचारांपासून दलितांना मुक्त करणे आणि त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. कारण दीर्घकालीन पारंपरिक श्रद्धांना त्वरित नष्ट केले जाऊ शकत नाही.



अण्णाभाऊंच्या गोष्टींत अथवा लिखाणात विनोद नसतो, असं नाही; पण त्यांचा प्रकृतीधर्म आहे गंभीर लेखकाचा. ज्यांनी फार भोगलं आहे, सात पडद्यांतून नव्हे, तर समोरासमोर जीवनातल्या क्रूर सत्याचं ज्याला दर्शन घडलं आहे. अशा पोटतिडकीने लिहणाऱ्या साहित्यिकाचा आत्मा त्यांना लाभला आहे. म्हणून साहजिकच त्यांच्या गोष्टी मोठ्या वैशिट्यपूर्ण असतात. म्हणून तत्कालीन सर्व बड्या कथाकारांपेक्षा ते निराळे आहेत. या लेखकाला प्रतिभेचे देणं लाभलं आहे. जीवनात आग ओकणाऱ्या सर्व तऱ्हेच्या गोष्टींच्या अनुभव त्यांच्या गाठी आहे. त्यांच्या मनात एकप्रकारचा पीळ आहे. ते अन्यायाविरुद्ध बंड उभारणाऱ्या वृत्तीचे पूजक आहेत.

मुंबई, पूणे आणि मधील शहरी पर्यावरणाने त्यांच्या लिखाणावर लक्षणीय प्रभाव टाकला. त्यांनी तो डायस्टोपियन परिवाराच्या रूपात दाखवला. त्यांनी त्यांच्या मुंबईची लावणी आणि मुंबईचा गिरणी कामगार या दोन गाण्यांतून मुंबईला दुर्व्यवहारी, शोषणकारी, असमान और अन्यायपूर्ण असे म्हटले आहे. त्यांच्या कार्याचा मोजदाद करताच येत नाही, इतक्या भव्य प्रमाणात त्यांची कारकीर्द नजरेत भरते, तिला दुर्लक्षित करुन चालणार नाही. भाऊ साठे हे दलितांचे आणि विशेषतः मांग जातीचे प्रतीक बनले आहेत. शासन मान्यता असलेली लोकशाहीर अण्णाभाऊ साठे डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची स्थापना १९८५ मध्ये मांग समाजातील लोकांसाठी करण्यात आली. तसेच मानव हक्क अभियानाच्या (एक मांग-आंबेडकरी संस्था) मार्फत विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. अत्यंत महत्वाचे म्हणजे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस आणि भारतीय जनता पक्ष- शिवसेना युती सारख्या राजकीय पक्षांनी मांगांकडून निवडणुकांमध्ये समर्थन मिळविण्यासाठी त्यांच्या प्रतिमेचा वापर केला आहे आणि आजही करीत असतात.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम शाहीर अण्णाभाऊ साठे यांनी केले. साठे यांनी मराठी भाषेत ३५ कादंबऱ्या लिहिल्या. त्यामध्ये फकिरा (१९५९) समाविष्ट आहे, ज्याला १९६१ मध्ये राज्य सरकारच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला आहे. साठेंच्या लघु कथांचा संग्रह १५ आहे, ज्यामध्ये मोठ्या संख्येने बऱ्याच भारतीय भाषांमध्ये आणि २७ गैरभारतीय भाषांमध्ये भाषांतरित केल्या गेल्या आहेत. कादंबरी आणि लघुकथा यांच्या व्यतिरिक्त साठे यांनी नाटक, रशियातील भ्रमंती, १२ पटकथा आणि मराठी पोवाडा शैलीतील १० गाणी लिहिली.

१ ऑगस्ट २००१ रोजी भारतीय पोस्टाने ४ रु. च्या टपाल तिकिटावर साठेंचे चित्र ठेवले होते. साठेंच्या जन्म शताब्दी वर्षाच्या निमित्ताने १ ऑगस्ट २०१९ रोजी हे टपाल तिकीट वितरित करण्यात आले. पुण्यातील सेनापती बापट चौकानजीक रस्त्याला अण्णाभाऊ साठे मार्ग म्हणुन घोषित करण्यात आले. मुंबईच्या कुर्लामधील एका उड्डाणपुलासह अनेक इमारतींना त्यांचे नांव देण्यात आले आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनी, त्यांना आदराने व विनम्रपणे श्रद्धांजली अर्पण करणे, हा मराठी भाषिकांसाठी एक महत्त्वाचा दिवस असतो. त्यांच्या कार्याला व विचारांना स्मरून त्यांना आदराने अभिवादन करणे, हा या दिवसाचा उद्देश आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या ५६ व्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

## संपादकीय....

# प्लॅस्टिक फुलांवर बंदी

राज्यात सर्रासपणे प्लॅस्टिक फुलांचा वापर प्रचंड प्रमाणात झाला आहे. त्यामुळे शेतीतील विविध प्रकारच्या फुलांची लागवड करून सदरची फुले बाजारात प्लॅस्टिकच्या फुलांमुळे अत्यल्प दरात विक्री होत असल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. प्लॅस्टिक पिशवी वापरावर ज्याप्रमाणे शासनाने बंदी आणली त्याप्रमाणे या प्लॅस्टिकच्या फुलांवर कायमस्वरूपी निर्बंध घातल्यास त्याचा शेतकरी वर्गास मोठा फायदा होणार आहे. द्राक्षपिक व इतर फळपिकांना पर्यायी व्यापारी पिक म्हणून फुलशेती केली जाते. या फुलशेतीसाठी लागणारी औषधे, मजुरी व ट्रान्सपोर्ट खर्च पाहता शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्यामुळे प्लॅस्टिक फुलांवर कायमस्वरूपी निर्बंध आणून फुलशेती करणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय देणेसाठी बैठक आयोजित करणे गरजेचे आहे. सणा-सुदीला, विविध उत्सवात सजावटीसाठी बाजारात येणाऱ्या प्लॅस्टिक फुलांमुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान होत आहे. त्यामुळे, कृत्रिम फुले बंद व्हावीत व फुल उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा यासाठी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये बैठक लावून तातडीने निर्णय घ्यावा अशी मागणी नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तासगाव कवठेमहांकाळचे आमदार रोहित पाटील यांनी केली. या मागणीला १०५ आमदारांच्या सहीसह पाठिंबा पत्र जोडत फुल उत्पादक शेतकऱ्यांसाठी हा विषय महत्त्वाचा आहे. प्लॅस्टिक फुलावर बंदी घालण्याच्या केलेल्या मागणीला विधिमंडळातील सत्ताधारी व विरोधी पक्षातील तब्बल १०५ आमदारांनी स्वाक्षरी देऊन पाठिंबा दर्शवला आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर पण त्याचबरोबर नागरिकांच्या आरोग्यावर व पर्यावरणावर प्लास्टिक फुलांमुळे गंभीर परिणाम होत आहे. ही महत्त्वाची बाब आमदार रोहित पाटील यांनी लक्षामध्ये आणून दिली.

# नळदुर्ग ग्रामीण मंडळ भाजपा कार्यकारणी निवडी जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी(एस.के.गायकवाड) :- भारतीय जनता पार्टी तुळजापूर विधानसभा अंतर्गत नळदुर्ग ग्रामीण मंडळाच्या विविध मोर्चा मंडळ अध्यक्ष - उपाध्यक्ष , कोषाध्यक्ष , सरचिटणीस- चिटणीस पदाच्या नुतन निवडी जाहीर करण्यात आले असून भाजपा नळदुर्ग ग्रामिण मंडळाच्या अध्यक्षा रंजनाताई विलास राठोड यानी माध्यमाना दिले सदर निवदीने प्रसिद्धी पत्रक.

भाजपाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर , जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नळदुर्ग ग्रामीण मंडळाच्या अध्यक्षा रंजनाताई विलास राठोड यांनी सदर निवडी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे निवडी जाहीर केल्या आहेत.



त्या पुढील प्रमाणे भाजपाच्या नळदुर्ग ग्रामीण मंडळ महिला मोर्चा मंडळ अध्यक्षपदी रेणुकाताई इंगोले लोहगाव, युवा मोर्चा मंडळ अध्यक्षपदी विक्रांत दुधाळकर आणदुर, किसान मोर्चा मंडळ अध्यक्षपदी अंगद जाधव बोळेगाव , ओबीसी मोर्चा मंडळ अध्यक्षपदी उमेश गोरे शहापूर , अल्पसंख्यांक मोर्चा मंडळाध्यक्षपदी फिरोज मुजावर इटकळ , अनुसूचित जाती मोर्चा मंडळ अध्यक्षपदी विठ्ठल घंटे निलेगाव तर भाजपा नळदुर्ग ग्रामीण मंडळ उपाध्यक्षपदी राधा मिटकर वागदरी , विवेकानंद मेलगिरी सिंदगाव , प्रवीण भोसले गंधोरा आदींची निवडी करण्यात आली .

कोषाध्यक्षपदी नळदुर्ग ग्रामीण मंडळ वसंत रामा पवार जळकोटवाडी नळ याची निवड करण्यात आली आहे . सरचिटणीस पदी संजय मोटे चिकुंद्रा , पद्माकर जेवळे सराटी, तर चिटणीस पदी सतीश काटे नंदगाव , ज्ञानेश्वर , पाटील होर्टी, रेश्मा घंटे केशेगाव , किशोर सुरवसे वागदरी , गणेश सूर्यवंशी आणदुर, आदिती कुलकर्णी हंगरगा नळ , गौरी सालगे खुदावाडी आदी पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यांच्या या निवडीचे भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यातून अभिनंदन केले जात आहे.

# स्वेरीमध्ये 'इंट्रोडक्शन टू अ‍ॅन्सीस' कार्यशाळा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग च्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग व संशोधन व विकास (रिसर्च अँड डेव्हलपमेंट) सेल यांच्या संयुक्त विद्यमाने 'इंट्रोडक्शन टू अ‍ॅन्सीस' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ही कार्यशाळा अ‍ॅन्सीस व ए.आर.के. सोल्युशन्स, पुणे यांच्या तांत्रिक सहकार्याने पार पडली.

या एकदिवसीय कार्यशाळेत द्वितीय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या १२० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. अ‍ॅन्सीस सॉफ्टवेअरच्या वापराविषयी मूलभूत ज्ञान, सैद्धांतिक संकल्पना, तसेच सिम्युलेशन तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक मार्गदर्शन देणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. औद्योगिक क्षेत्रात अत्यंत महत्त्वाचे असलेले फाईनाईट एलेमेंट अनालिसिस (एफइए) व कॉम्प्युटर एडेड इंजिनिअरिंग (सीएई) या तंत्रज्ञानांच्या सहाय्याने डिझाईन प्रक्रियेतील अचूकतेची महत्ता व गरज याचे स्पष्टीकरण प्रशिक्षकांनी उदाहरणांसहित दिले. कार्यशाळेसाठी पुण्यातील ए.आर.के. सोल्युशन्स कंपनीचे तज्ज्ञ मंजुनाथ, चेतन पाटील, अनुप सिंग आणि गजानन जिल्हेवार हे आले होते. त्यांनी अत्यंत समर्पक व संवादात्मक सत्रांद्वारे विद्यार्थ्यांना अ‍ॅन्सीस सॉफ्टवेअरच्या विविध ॲप्लिकेशन्स संदर्भात सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध इंडस्ट्री-ओरिएंटेड केस स्टडीज आणि सिम्युलेशन मॉडेलिंगचा अनुभव घेतला. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात आयोजिलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत विद्यार्थ्यांचा भरघोस सहभाग लाभला. गुणवत्तेच्या आधारे निवडण्यात आलेल्या विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. यामध्ये प्रथम क्रमांक अश्विनी दत्तू भोंग यांना रु.५ हजार, द्वितीय क्रमांक सुरज महादेव घोडके यांना रु.३ हजार तर तृतीय क्रमांक प्राजक्ता प्रदीप कोथावले यांना रु. २ हजार रोख रक्कम व प्रमाणपत्र देवून त्यांना सन्मानित करण्यात आले. विजेते विद्यार्थी हे मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्गात शिक्षण घेणारे आहेत. समारोपप्रसंगी स्वेरीचे सचिव प्रा. सुरज रोंगे व विद्यापीठ विकास मंचचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रोहित राऊत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख कौशल्ये आत्मसात करण्यासाठी अशा प्रशिक्षण कार्यशाळांचे महत्त्व अधोरेखित केले. ही कार्यशाळा आयोजित करण्यासाठी स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन लाभले. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच अशा उच्चस्तरीय उपक्रमांची साखळी या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचते आहे. स्वेरी ही शिक्षण संस्था ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण, संशोधनप्रधान व उद्योगाभिमुख शिक्षणासाठी राज्यभरात ओळखली जाते. संस्थेच्या ५००० हून अधिक विद्यार्थी संख्या, नॅक ए प्लस (३.४६ सी.जी.पी.ए.) मानांकन, एन.बी.ए. मान्यता प्राप्त अभ्यासक्रम आणि अलीकडे प्राप्त झालेला युजीसी व पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठाकडून मिळालेला स्वायत्त (ऑटोनॉमस) दर्जा हे संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्ता व प्रशासनिक दृढतेचे उत्तम उदाहरण आहे. ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली असून, त्यांनी सैद्धांतिक व प्रात्यक्षिक ज्ञानातून औद्योगिक क्षेत्रातील तांत्रिक क्षमता विकसित केल्या. ही कार्यशाळा स्वेरीच्या उद्योगाभिमुख शिक्षण व संशोधनवाढीच्या धोरणाची साक्ष ठरली आहे. मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. एस. बी. भोसले, आर. अँड डी. अधिष्ठाता डॉ. अमरजीत केने, समन्वयक प्रा. सी. सी. जाधव आणि प्रा. एस. एन. मोरे यांनी कार्यशाळेच्या आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार यांच्या सहकार्याने, व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली सदरची कार्यशाळा यशस्वी ठरली.




## आरोपींवर गुन्हे दाखल, पंढरपूर पोलिसांची धडक कारवाई

## शेती पंपाच्या पाण्याच्या मोटारीसह मुद्देमाल जप्त

# पंढरपूर तालुका पोलिसांनी अकरा लाख रुपयांचा मुद्देमाल केला जप्त



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पाण्याच्या पाच मोटारी एक मोटर सायकल स्वामी दत्तकृपा दिंडीची ट्रॅक्टर असा एकूण ११ लाख रुपये चा मुद्देमाल जप्त.

पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे गुरसाळे या गावी दिनांक ३०/६/२०२५ रोजी फिर्यादी नामे रुपेश अजितराव देवकते वय २७ राहणार गोसावी यांच्या मालकीच्या शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या दोन पाण्याच्या मोटारी चोरी गेल्या बाबत पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर ५४४/२४इछड३०३ अन्वये गुन्हा दाखल झाला होता. सदर गुण्याचा तपास कामी माननीय पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी साहेब आणि मुंबई शिंदेचे खासदार नरेश मस्के आणि अनिल देसाई यांची मुंबई भेट झाली माजी खासदार म्हणून यांनी त्वरित अभंग प्रभावाने शेतकऱ्यांच्या मोटारी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत आदेशित केले होते त्या अनुषंगाने पंढरपूर तालुका पोलिसांनी एकूण चार आरोपींची नावे निष्पन्न करून त्यापैकी दोन आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे सखोल तपास करून एकूण पाच शेती पंपाच्या पाण्याच्या मोटारी किंमत रुपये दोन लाख पंधरा हजार व एक मोटरसायकल असा एकूण दोन लाख ३५ हजार मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त केला असून आणखीन सदर मोठा चोरीच्या गुन्ह्यांमध्ये आरोपी निष्पन्न होण्याची शक्यता आहे या अनुषंगाने पंढरपूर तालुका पोलीस तपास करीत आहे.

तसेच वेळापूर येथील आषाढी वारीच्या वेळी दोन जुलै २०२५ रोजी स्वामी दत्तकृपा दिंडीतील पालखी मधील ट्रॅक्टर चोरीला गेला होता. त्याबाबत पंढरपूर पोलिसांनी तपास करून नक्की काय काय करायचे बाकी तेवढ्यासाठी किती काम काम आहे . चोरीच गेलेल्या ट्रॅक्टर मौज सळे या गावातून वेळापूर पोलीस स्टेशन गुन्हे अन्वेषण रजिस्टर नंबर२५१/२५ बी एम एस कलम ३०३/ दोन प्रमाणे गुन्हा दाखल आहे. मोटारी व एक मोटरसायकल असा एकूण तालुका पोलिसांनी जप्त केला आहे. ट्रॅक्टर बाबत वेळापूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी साहेब माननीय अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर साहेब माननीय उपविभागीय अधिकारी अर्जुन भोसले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टीवाय मुजावर पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले पोलीस उपनिरीक्षक विक्रम वाढणे साहेब फौजदार शेंडगे पोलीस हवलदार घंटे पोलीस हवालदार सय्यद बालाजी कदम सुशील शिंदे दीपक भोसले सुहास देशमुख गजानन माळी सागर गवळी चालक पोलीस कॉन्स्टेबल नदाब गोडसे यांच्या पथकाने कामगिरी केली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्री परमेश्वर मंदिर, वागदरी येथील गौपूर महाद्वाराचे बांधकाम जलद गतीने सुरू



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/ता. अक्कलकोट : येथील ग्रामदैवत व श्रद्धास्थान असलेल्या जागृत श्री परमेश्वर मंदिराच्या गौपूर महाद्वाराचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू असून, हे भव्य व कलाकुसरीने नटलेले द्वार लवकरच भक्तांच्या सेवेत साकार होणार आहे. मंदिर परिसरात सध्या बांधकामाचे काम गार, अभियंते आणि देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी अथक मेहनत घेत असून, संपूर्ण गौपूरचे अत्यंत बारकाईने आणि परंपरागत शैलीत उभारले जात आहे.

या गौपूराचे बांधकाम केवळ एक वास्तू न बांधता, येथील संस्कृती, श्रद्धा आणि परंपरेचे प्रतीक म्हणून साकारले जात आहे. मंदिराचे बांधकाम प्राचीन दगडी शिल्पशैली आणि आधुनिक टिकाऊ तंत्रज्ञानाचा संगम साधून उभारले जात असून, यात असंख्य घंटा, नक्षीकाम, शिल्पकला आणि स्थापत्यशास्त्राचा उत्कृष्ट नमुना पाहायला मिळणार आहे.

सध्या बांधकामासाठी लागणाऱ्या विटा, रेती, सिमेंट, लोखंड यांचे साठवण व काम चालू असून, संपूर्ण कार्य स्वच्छ आणि भक्तिभावाने पार पडत आहे. भविष्यात मंदिरात येणाऱ्या भाविकांना हे गौपूर एक भव्य स्वागतद्वार म्हणून अनुभवता येईल.

**या पवित्र कार्यात सर्व ग्रामस्थ, श्रद्धावान भक्तगण, दानशूर व्यक्ती व हितचिंतकांनी आर्थिक व श्रमदानाच्या स्वरूपात सहकार्य करावे, असे आवाहन श्री परमेश्वर देवस्थान ट्रस्ट, वागदरी यांच्याकडून करण्यात आले आहे. देणगी देऊ इच्छिणाऱ्यांनी थेट देवस्थान ट्रस्टशी संपर्क साधावा, जेणेकरून या पुण्यकार्यात सर्वांचा सहभाग मिळेल व लवकरच हे गौपूरचे कार्य पूर्णत्वास जाईल.**

**– धोंडपा नंदे संपादक गावगाथा वागदरी**

# श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरास आषाढी यात्रेत १० कोटी ८४ लाखाचे उत्पन्न

## मंदिरे समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रा कालावधीत वारकरी भाविकांनी श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेच्या चरणी १० कोटी ८४ लाख रुपयांचे दान केले तसेच सोन्या चांदीचे दागिने अर्पण केले असून मंदिर समितीला लाडू प्रसाद, देणगी, भक्तनिवास, हुंडीपेटी, श्रींच्या चरणाजवळ आदी विविध देणग्यांच्या माध्यमातून उत्पन्न मिळाल्याची माहिती मंदिरे समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.



यंदा आषाढी यात्रा कालावधीत दर्शनरांगेत भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. भाविकांचे सुलभ जलद दर्शन होण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना देखील मंदिर समितीने केल्या होत्या. आषाढ शुध्द ०१ (दिनांक २६ जून) ते आषाढ शुध्द १५ (दिनांक १० जुलै) या कालावधीत भाविकांनी श्रींच्या चरणाजवळ ७५०५२९१ रुपये अर्पण, २८८३३५६९ रुपये देणगी, ९४०४३४० रुपये लाडू प्रसाद विक्री, ४५४१४५८ रुपये भक्तनिवास, १४४७१३४८ रुपये हुंडीपेटी, ३२४५६८२ रूपये परिवार देवता तसेच २५९६१७६८ रुपये सोने-चांदी अर्पण, तसेच अगरबत्ती, चंदन खोड, चंदन पावडर, महावस्त्रे, फोटो, मोबाईल लॉकर आदी माध्यमातून १२४५०७५ रुपये व ३ इलेक्ट्रिक रिक्षा /बस चे ३२ लक्ष इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे.

मागील वर्षी श्रींच्या चरणाजवळ ७७०६६९४ रुपये अर्पण, २६९२२५७८ रुपये देणगी, ९८५३००० रुपये लाडू प्रसाद विक्री, ५०६०४३७ रुपये भक्तनिवास, ९३५५०७३ रुपये हुंडीपेटी, ३१७९०६८ रूपये परिवार देवता तसेच २२१५३६०१ रुपये सोने-चांदी अर्पण, तसेच अगरबत्ती, चंदन खोड, चंदन पावडर, महावस्त्रे, फोटो, मोबाईल लॉकर आदी माध्यमातून ६२८१०९ रुपये उत्पन्न प्राप्त झाले आहे.

सन २०२४ च्या आषाढी यात्रेत रू. ८४८५८५६०/- व या वर्षीच्या यात्रेत रू. १०८४०८५३१/- इतके उत्पन्न प्राप्त असून, मागील यात्रेच्या तुलनेत रू. २३५४९९७१/- इतकी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. या मिळालेल्या दानातून श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणा-या वारकरी भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न राहील असे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगितले.

# स्वा. सावरकर विद्यालय कोठुरे येथे विज्ञान छंद मंडळाची स्थापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संचलित स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठुरे येथे विज्ञान छंद मंडळाची स्थापना नुकतेच करण्यात आली असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील सातपुते होते. भारताचे मिसाईल मॅन ए.पी. जे अब्दुल कलाम व सरस्वती माता यांच्या प्रतिमेचे पूजन ने करण्यात आली. शिक्षिका अनिता पवार यांनी प्रास्ताविकेत मागील वर्षी विज्ञान छंद मंडळ द्वारा आयोजित विविध उपक्रमांची माहिती दिली असून विज्ञान छंद मंडळाचे उद्दिष्ट, कार्य व रचना याची ओळख उपस्थित



त्यांना करून दिली. छंद मंडळात प्रत्येक वर्गातील एक विद्यार्थी व एक विद्यार्थिनी प्रतिनिधी निवडुन विज्ञान छंद मंडळाची कार्यकारणी निर्माण करण्यात आली, . विज्ञान छंद मंडळातील नवनियुक्त कार्यकारणींचा तसेच मंडळातील सहभागी विद्यार्थ्यांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील सातपुते यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून विद्यार्थ्यांना विज्ञानाचे महत्त्व पटवून दिले, तसेच सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येक घटनेमागील कार्यकारण भाव समजावून घेण्याचे आवाहन केले व भारतीय शास्त्रज्ञांची माहिती व त्यांनी लावलेले शोध याची विशेष नोंद घ्या व छोटे छोटे प्रयोग आत्ताच करून भावी शास्त्रज्ञ तुम्ही होऊ शकता याबद्दल विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी उपस्थितांना विज्ञान प्रतिज्ञा देण्यात आली विद्यालयातील विज्ञान शिक्षिका सुरेखा कापडी यांनी विज्ञान छंद मंडळाच्या स्थापनेच्या निमित्ताने विद्यालय परिसरात लावल्या जाणाऱ्या आयुर्वेदिक व धार्मिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या अशा बेल वृक्षा बद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. कार्यक्रमाची सांगता विद्यालयाचे मुख्याध्यापक सातपुते यांच्या हस्ते बेल वृक्षाच्या वृक्षारोपणाने झाली. यावेळी विद्यालयातील शिक्षक नितीन सावकार, शिवाजी सानप, संजय निकम, सुधाकर निकम, लहानु शिंदे,किरण भडांगे,माधव गाडे, यासह अनिता पवार ,सुनिता दाणी, ज्योती चितळकर, अर्चना कुठे,प्रियांका आव्हाड,गायत्री जाधव या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. श्रुती दरोगे व धैर्या डोंगरे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दत्तात्रय दराडे, शिवाजी पोटे,राजेंद्र पवार, मनोज मोगल यांचे सहकार्य लाभले.

# श्री जगदंबा कमलादेवी चरणी सोन्याची टुशी अर्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : जगदंबा कमलादेवी चरणी सोन्याची ठुशी अर्पण करण्यात आली आहे अंदाजे किंमत रुपये१,०२,४९२/ किमतीचे असलेले संजय लक्ष्मण घोलप ,अभय लक्ष्मण घोलप, करमाळा यांनी अर्पण केलेले आहे.

यानिमित्त त्यांचा सत्कार मंदिर समितीकडून पुरोहित कन्हैयालाल पुरानी व्यवस्थापक अशोक घाटे, पद्माकर सूर्य पुजारी, तसेच पूजा पुजारी सेवेकरी मानकरी यांनी सत्कार केला.




# तक्षशिला विद्वता सन्मानाने नागपूरचे डॉ. प्रशांत गायकवाड यांचा गौरव



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर/प्रतिनिधी : काशी हिंदू विद्यापीठ, वाराणसीचे कुलगुरू डॉ. संभाजी बाविस्कर आणि श्री श्री १००८ कृष्णानंद महाराज, महामंडलेश्वर, पीठाधीश्वर जुना आखाडा यांच्या हस्ते परिवर्तन योग सुदर्शन सभेचे मुख्य अतिथी डॉ. प्रशांत गायकवाड यांना गुरु पौर्णिमेच्या दिवशी न्यू दिल्ली, करोलबाग येथील सभागृहात तक्षशिला विद्वता सन्मान आणि सुदर्शन सभेचे प्रमुख परिवर्तन योगेश यांच्या हस्ते सुदर्शन पुरस्कार सुदर्शन सभेचे अध्यक्ष श्री. त्रेहान यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

हा सन्मान डॉ. गायकवाड यांना संगीत आणि ज्योतिष या क्षेत्रांतील जागतिक ख्यातीमुळे देण्यात आला. ३२४ तास सलग तबला वादनाचा (गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रिकार्ड) जागतिक विक्रम तसेच ४७ देशांतील प्रतिनिधी कलाकारांना भारतीय कला व संस्कृतीचे शिक्षण देण्याचा जागतिक विक्रम हे दोन महत्त्वाचे विक्रम त्यांच्या नावावर आहेत. विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित डॉ. प्रशांत गायकवाड सध्या नागपूर येथील भारतीय विद्या भवनच्या भवन्स सिव्हिल लाईन्स शाळेत कार्यरत आहेत.

कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना मानद डॉक्टरेट, तक्षशिला सन्मान, मणिकर्णिका सन्मान, विश्व अनमोल रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ. प्रशांत गायकवाड उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि वैदिक मंत्रोच्चाराने करण्यात आली. त्यानंतर कथ्थक नृत्यात विशाखा जी यांनी गणेश परण आणि शिव स्तोत्र सादर केले. उपस्थित मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. त्यानंतर विविध क्षेत्रांत विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींना डॉ. प्रशांत गायकवाड यांच्या हस्ते मानद डॉक्टरेट देऊन सन्मानित करण्यात आले.

# शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी प्रा. काशिनाथ आटपाडकर बिनविरोध



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वरकुटे मलवडी/प्रतिनिधी : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुरणेवाडी ता. माण जि. सातारा या शाळेत पहिली ते आठवीचे वर्ग भरत असून या शाळेची शालेय व्यवस्थापन समिती ची मुदत संपल्याने विसर्जित झाली असून नव्याने समिती स्थापन करण्यासाठी सर्व पालकांची सभा दि १६/०७/२०२५ रोजी सकाळी ११वाजता शाळेत पालक सभा आयोजित करण्यात आली. यावेळी प्रत्येक वर्गातून एक प्रतिनिधी निवडण्यात आला.यामधे महिलांना पन्नास टक्के आरक्षण देण्यात आले पालक सदस्यांतून अध्यक्ष म्हणून प्रा काशिनाथ बाबा आटपाडकर तर उपाध्यक्ष म्हणून सुरेश जगनाथ नरळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या सभेला सूचक म्हणून ऋषिकेश नरळे व सीमा अभिजित बनसोडे यांनी अनुमोदन दिले तर सचिव म्हणून मुख्याध्यापक संजय गोरड सर यांनी काम पाहिले . व सोनवल सर, सुवर्ण रेखा फड मॅडम यांनी सहकार्य केले.

ही सभा सर्व पालक सदस्याच्या उपस्थितीत खेळीमेळीत पार पडली. या निवडीबद्दल सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे यावेळी मां सरपंच कुबेर आटपाडकर किरण आटपाडकर, म्हाकु मिसाळ प्रशांत आटपाडकर, रंजना करांडे, योगिता आटपाडकर, अक्षय आटपाडकर, राहुल आटपाडकर , नाथा गळवे, आदी मान्यवर उपस्थित होते.

**विविध मागण्यांसाठी सुरु केलेले उपोषण स्थगित**

**व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवून दिला होता पाठिंबा**

# पोलिस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांच्या लेखी आश्वासनानंतर मेघराज पाटील यांचे उपोषण मागे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे

इंदापूर : पळसदेव येथील मेघराज पाटील यांनी विविध मागण्यांसाठी सुरू केलेले उपोषण आखेर पोलिस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले असून विविध प्रकारचे गुन्हे दाखल असलेल्या गावगुंड अप्पा शिंदे याच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करावी व धरणग्रस्तांच्या विविध समस्यांवर तत्काळ निर्णय व्हावा, यासाठी मेघराज पाटील कुचेकर हे पळसदेव ग्रामपंचायत कार्यालयासमोर उपोषणास बसले होते. आखेर उपोषणाच्या पाचव्या दिवशी अन्नपाणी त्यागल्याने त्यांची प्रकृती गंभीर बनत चालली होती. येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्रकृती खालावली असल्याचे स्पष्ट सांगितले होते. यानंतर इंदापूर पोलिस स्टेशन चे पोलीस निरीक्षक




सूर्यकांत कोकणे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन त्यांची समजूत घातली.

मेघराज पाटील यांनी केलेल्या मागण्यां पैकी पोलिस ठाण्याशी संबंधित असलेली अप्पा शिंदे याच्यावरील प्रतिबंधात्मक कारवाईची मागणी मान्य करत इतर मागण्यांचे संबंधित खात्यांना पत्रव्यवहार केल्याचे सांगत उपोषण मागे घेण्याची विनंती केली.

त्यांची विनंती मान्य करत मेघराज पाटील यांनी सरबत घेऊन उपोषण सोडले. दरम्यान, उपोषणाच्या पाचव्या दिवशी पळसदेव नागरिकांनी आक्रमक पवित्रा घेत गाव बंदची हाक दिली होती. या हाकेला प्रतिसाद देत गावातील व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवत मेघराज पाटील यांच्या उपोषणास पाठिंबा दर्शवला होता.

**पुणे ग्रामीण चे एस पी संदिपसिंग गील साहेब यांना भेटल्याने इंदापूर पोलिस स्टेशन चे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांचा इगो हार्ट झाला असल्याचे व माझ्या जिवीताचे कांहीं बरे वाईट झाले तर यास सर्वस्वी पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे हेच जबाबदार असतील असा आरोप देखील मेघराज पाटील यांनी सोशल मीडिया वरती बोलताना व्यक्त केला होता.**

# नुकसान भरपाईची पुर्ण रक्कम द्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाराभाटी : स्थानिक ठिकाणचे शेतकरी यांच्या शेतातील रब्बी धान्य पिकाची व मका पिकाची नुकसान जंगलातील रानडुक्कर यांनी मोठ्या प्रमाणावर नुकसान केली आहे. त्यांचा पंचनामा करून पंचनाम्यात ठरलेली रक्कम मिळाली नाही. त्याअनुषंगाने शेतकऱ्यांनी जिल्हा ठिकाण गाढून



**बाराभाटी येथील शेतकऱ्यांची मागणी : अन्यथा उपोषणाचा इशारा, संबधितावर कारवाई करा**

संबंधिताची तक्रार करण्यात आली. नुकसानभरपाई पूर्ण मिळावी ही मागणी करण्यात आली आहे.

साझा क्रमांक ६ मध्ये येत असणारे ग्रामीण भागातील शेतकरी हे मोठ्या परिश्रमाने शेती करतात. शेतकरी यांचे धान्य पिक व मका पिक याची नुकसान भरपाई ही परिपूर्ण रक्कम न मिळता केवळ अल्पशा रक्कम देऊन तोंड बंद करण्यात आले. हा अन्याय आहे. वन अधिकारी नवेगावबांध यांनी शेतकरी वर्गाचे फारच नुकसान केले आहे.

यासंदर्भात संबधित शेतकरी यांनी निवासी जिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे यांना तसेच उपवन संरक्षक पवनकुमार भांगे यांना निवेदन सादर केले. जवळपास दोन लाखाच्या आसपास रक्कम या ठिकाणी पंचनामा करताना होती. निवेदनातील शिष्टमंडळात महेश बेलखोडे, किशोर येरणे, मदन नाईक, दादाजी शिवणकर आदी उपस्थित होते.

**मला दोन दिवसाची मुदत दया, प्रकरण तपासून सांगतो, संबधित यांना बोलतो.**

**– पवनकुमार भांगे, भावसे, उपवन संरक्षक, वनभवन गोंदिया.**

## थोडक्यात...

### प्रशासनाची फसवणूक केल्याप्रकरणी; तिघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : प्रशासनाची फसवणूक केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १४ जुलै रोजी पुना नाका येथे घडली.याप्रकरणी सचिन अलकुंटे (वय-५०,रा.उत्तर सदर बजार) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सी.के मंडल व त्यांची पत्नी नीलिमा मंडलं तसेच दिवाशीश दिलीप कुमार शर्मा (रा.उमा नगरी,पुना नाका) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, आरोग्य विभागाकडील कर्मचारी व फौजदार चावडी पोलीस ठाणे कडील पथकासह सी.के मंडल यांच्या आयुर्वेदिक दवाखाना येथे पाहणी केले असता सी.के मंडल व त्यांची पत्नी नीलिमा यांनी त्यांची वैद्यकीय व्यवसायाकरिता लागणाऱ्या शैक्षणिक पात्रता नसल्याने व नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक नसल्याने तसेच त्यांची शैक्षणिक पात्रता नसताना देखील बेकायदेशीर वैद्यकीय व्यावसायिक प्रॅक्टिस करून हे डॉक्टर उपादी लावून त्यांनी सामान्य व प्रशासनाची फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील हे करित आहे.

### अज्ञात चोरट्याने ऑईल चोरले

सोलापूर, (प्रतिनिधी) : अज्ञात चोरट्याने ५४० लिटर ऑइल चोरून नेल्याची घटना पसारे वस्ती तुळजापूर रोड येथे दि.१२ ते १३ जुलै दरम्यान घडली याप्रकरणी गंगाधर मल्लिनाथ गुमटे (वय-५३,रा.गुमटे वस्ती,जुना तुळजापूर नाका,शेळगी) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,पसारे वस्ती तुळजापूर रोड या ठिकाणी बिनशेती जमीन वरील ३१५ के व्ही ए चे विद्युत रोहिटरचे २१ हजार ६०० रुपये किमतीचे वरील ५४० लिटर ऑइल अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार लोहार हे करीत आहेत.

# सर्व लोककल्याणकारी योजनेचे मानधन वेळेवर करावे

## आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांची विधानसभेत मागणी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला/प्रतिनिधी : केंद्रसरकार पुरस्कृत संजय गांधी, इंदिरा गांधी, श्रावण बाळ , वयोवृध्द अपंग इत्यादी लोककल्याणकारी योजना शासनाने सुरु केल्या. परंतु संबंधीत योजनेच्या लाभार्थ्यांचे मानधन वेळेवर मिळत नसल्याने लाभार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी निराधार बांधवांच्या मानधनाविषयी प्रश्न उपस्थित करुन निराधार लोकांना वेळेवर मानधन मिळाल्यास त्यांना दिलासा मिळू शकेल. शासनाने यावर लक्ष देऊन कार्यवाही करावी अशी ठाम मागणी अधिवेशनादरम्यान केली.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सर्वसामान्य, गोरगरीब, दिनदलित, कष्टकरी, शेतकरी बांधवांच्या प्रश्नावरून आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आक्रमक भूमिका घेऊन अनेक प्रश्न उपस्थित केले होते. आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी शेतकर्यांचा सातबारा कोरा करून व शेतकर्यांना सरसकट कर्ज माफी द्यावी. अवकाळी पावसाने राज्यातील शेतकर्यांचे नुकसान झाले आहे. त्या शेतकर्यांना अर्थिक मदत मिळावी. राज्यातील दिव्यांगांचे काही प्रश्न निधी अभावी प्रलंबित आहेत त्यासाठी सरकारने निधी उपलब्ध करुन द्यावा. संजय गांधी योजनेतील लाभार्थीना वेळेत अनुदान वेळेवर मिळावे, माण व कोरडा नदीला कॅनॉलचा दर्जा देण्यात यावा. पंढरपुर ते सांगोला या महामार्गाने अनेक पालख्या जातात त्याचा विचार करुन हा महामार्ग चौपदरी करावा. शक्तीपीठ बाधीत शेतकर्यांच्या जमिनिला एकरी ४ कोटी रुपये देण्यात यावेत. सौरउर्जा योजनेतील अटी शिथील कराव्यात, आदिशक्ती अभियान राबवत असताना मुलींना गर्भाशयाचा कॅन्सर होऊ नये यासाठी सरकारने कमी वयातच औषधे द्यावीत, परराज्यातून महाराष्ट्रात येणारी भेसळयुक्त औषधे, आशा सेविका यांचे मनाधनात वाढ करावी, राज्यातील बी.ए.एम.एस व बी.एच. एम.एस. डॉक्टरांचे प्रलंबित प्रश्न आदी प्रश्न उपस्थित केले.

आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी विधानसभेत लक्षवेधीच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या जीवनमानाशी थेट संबंधित अनेक प्रश्न शासनाच्या निदर्शनास आणून दिले. हे मुद्दे सुरक्षितता, सन्मानाने जगण्याचा हक्क आणि मूलभूत नागरी गरजांशी संबंधित असल्याने, तातडीच्या व ठोस कृतीची गरज आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी स्पष्टपणे मांडली. त्यामुळे सर्वसामान्यांच्या प्रश्नांविषयी आम.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आक्रमक भूमिका घेतली.

## निफाड नगरपंचायततर्फे विविध ठिकाणी वृक्षारोपण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायत मार्फत हरित कुंभ अभियान अंतर्गत शहरात विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.

माझी वसुंधरा अभियान तसेच जिल्हाधिकारी जलज शर्मा यांचे सुचनेनुसार हरित कुंभ अभियान अंतर्गत शहरातील कोळवाडी रोड रंगनाथ पा. कुंदे नगर, संगमेश्वर मंदिर परिसर, गायत्री नगर आदी ठिकाणी निफाड नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष सौ शारदा कापसे, उपनगराध्यक्ष अनिल पा.कुंदे तसेच मुख्याधिकारी धीरज भामरे यांचे मार्गदर्शनाखाली हे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शहरातील नागरिक विद्यार्थी निफाड नगरपंचायत अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते..

## विस्तार अधिकारी अमर धोडमनी यांचा सिन्नूर ग्रामपंचायत वतीने सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील सिन्नूर ग्रामपंचायतला अक्कलकोट पंचायत समिती विस्तार अधिकारी अमर धोडमनी पाहिलांदा भेट दिले असता ग्रामपंचायत वतीने सत्कार सरपंच कल्पना सोनकांबळे यांचा हस्ते करण्यात आले सोबतच नूतन ग्रामसेवक नागनाथ सोरेगांव यांचे सत्कार ग्रामपंचायत सदस्य जगदीश उजनी व गावचे पोलीस पाटील राजु पाठण यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी गावं मध्ये पाहणी करून प्रधान मंत्री आवास योजना घरकुल व इतर कामाची पाहणी केले लाभार्थी न उरलेले करारनामा लवकर करून घेण्यास सांगितले.

यावेळी गावातले विविध विषय संदर्भात चर्चा करून समस्या मार्ग सोडवण्यास सांगितले यावेळी सरपंच कल्पना सोनकांबळे उपसरपंच प्रकाश कळसगोंड, जगदीश उजनी, पोलीस पाटील राजु पठण, राजकुमार हौदे, चेन्नया स्वामी, शेवू राठोड निंगप्पा निंबाळ, लागमू गायकवाड,रवी जेवर्गी, सिराज पठण,मांतू राठोड, ग्रामपंचायत कर्मचारी शिंगे, जेवर्गी, कोटनूर, मुल्ला, कांबळे, व गावातील नागरिक मोठा संख्याने उपस्थित होते.

## रस्ता क्रॉस करताना अपघात; अज्ञात इसमावर गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : रस्ता क्रॉस करताना अपघात प्रकरणी अज्ञात इसमावर विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २७ जून रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास होटगी रोड येथील फार्स्टक्राय कपड्याच्या शोरूम जवळ घडली. याप्रकरणी शुभांगी बसण्णा बमगोंडे (वय-३७,रा.स्वामी विवेकानंद नगर, हत्तुरे वस्ती) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी या फार्स्टक्राय कपड्याच्या शोरूम जवळील डिव्हायडरो येथे युनिक ब्लॉसन स्कूल कडे जाण्याकरिता रस्ता क्रॉस करत असताना अज्ञात दुचाकी क्रमांक एमएच.१३.बी.एच.४४०२ यावरील चालकाने निष्काळजीपणाने व भरधाव वेगाने वाहन चालवून धडक देऊन फिर्यादी यांना जखमी होण्यास कारणीभूत झाला असून फिर्यादी यांना हॉस्पिटलला घेऊन न जाता तसाच निघून गेला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हवालदार गावडे हे करीत आहेत.

## सहकार चळवळीच्या विकासात योगदान देणाऱ्या सहकारी संस्थेचा पुरस्कार देऊन होणार गौरव!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : राज्याच्या सहकार चळवळीच्या विकासात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या सहकारी संस्थांना राज्य सरकारमार्फत सहकार पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असून सन २०२३-२०२४या आर्थिक वर्षातील कामगिरीच्या आधारावर सहकार पुरस्कारासाठी संस्थांची निवड करण्यासाठीचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर केला आहे. सहकारी संस्थांनी १८ जुलै २०२५ पर्यंत संबंधित तालुका सहायक निबंधक कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन निफाडचे सहाय्यक निबंधक कांतीलाल गायकवाड यांनी केले आहे.

**निफाड तालुक्यातील पात्र संस्थानी प्रस्ताव दाखल करावे : कांतीलाल गायकवाड**

सहकार क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या सहकारी संस्थांना त्यांच्या सहकार क्षेत्रामधील योगदानाबद्दल पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णय निर्गमीत करण्यात आलेला आहे. युवक व महिला यांचा सहकारामध्ये सहभाग वाढविण्यासाठी या वर्षात विविध उपक्रमांचे आयोजन देशभर केले जात आहे. जिल्ह्यात स्वछता मोहिम, क्रिडा स्पर्धा, ग्राहक मेळावा या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ मध्ये रक्तदान करावयाचा शिवसंकल्प सहकार विभागाच्यावतीने घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने जिल्हा मध्यवर्ती बँक, नागरी सहकारी बँका, नागरी व कर्मचारी पतसंस्था, जिल्हा देखरेख संघ संस्था, सेवा सहकारी संस्था, (सर्व) जंगल कामगार सहकारी संस्था, सुशिक्षीत बेरोजगार संस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था, दुग्ध व मत्स सहकारी संस्था, यांचे अधिकारी कर्मचारी, अध्यक्ष, संचालक, सभासदांना व सर्व नागरीकांना आवाहन करण्यात आले आहे.

**पात्र संस्थांच्या निवडीसाठी संस्थाप्रकारनिहाय नोंदणी, वार्षिक सर्वसाधारण सभा, संचालक मंडळ सभा, नफा तोटा, थकबाकी, संस्थेवरील कायदेशीर कारवाई, लेखापरीक्षण व दोषदुरुस्ती अहवाल, निवडणूक, व्यवस्थापन, निधीची गुंतवणूक, प्रशिक्षण, सादर करावयाची प्रतिज्ञापत्रे यासाठी ५० गुण, संस्था प्रकारनिहाय निश्चित केलेल्या विशेष निकषांसाठी ३५ गुण व सहकारी संस्थेसाठी योगदान, जनतेसाठी दिलेले योगदान, सहकार चळवळीच्या विकासासाठी प्रयत्न, सहकारी, सार्वजनिक, धर्मादाय प्रयोजनासाठी केलेली मदतीसाठी २० गुण देण्यात येणार आहेत. शासन स्तरावरील समितीमार्फत २६ सप्टेंबर २०२५ पर्यंत पुरस्कार प्राप्त संस्थांची अंतिम निवड करण्यात येणार आहे. पुरस्काराविषयी अधिक माहिती सहकार विभागातील सहायक निबंधक यांच्या कार्यालयात संपर्क साधावा**

**सरकारच्या धोरणाचा कर्मचाऱ्यांकडून निषेध** — **अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करू**

# महावितरण कार्यक्षेत्रात खासगी ‘एन्ट्री’; द्वारसभेतून लातूर येथे कर्मचाऱ्यांचा विरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर/प्रतिनिधी : महानिर्मिती, महापारेषण कंपन्यांचे खासगीकरण व महावितरणच्या कार्यक्षेत्रात खासगी कंपन्यांच्या समांतर परवाना धोरणाविरोधात महाराष्ट्र वीज कामगार महासंघाने आक्रमक भूमिका घेतली आहे. लातूर येथील महावितरणच्या परिमंडळ कार्यालयाच्या गेट समोर मंगळवारी दि. १५ रोजी द्वारसभा घेऊन सरकारच्या धोरणांचा निषेध करण्यात आला. 'सरकारने कामगारविरोधी धोरण रद्द केले नाही, तर रस्त्यावर लढाई करू,' असा इशारा संघटनेने दिला आहे.



महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे महामंत्री अरुण पिवळ यांनी ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर पत्र लिहून खासगी कंपन्यांच्या समांतर परवाना धोरणाबाबत तातडीने हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे. महावितरण, महापारेषण, महानिर्मिती या सरकारी कंपन्या उत्कृष्ट कामगिरी करीत आहेत. महावितरण ही देशातील प्रथम आणि आशियातील दुसऱ्या क्रमांकाची कंपनी आहे. २०२२ व २०२३मध्ये वीज वितरणाच्या समांतर परवान्यासाठी काही कंपन्यांनी महावितरण कार्यक्षेत्रात अर्ज केला, तेव्हा वीज क्षेत्रातील सर्व संघटनांनीसंपाची हाक दिली होती. तेव्हा मुख्यमंत्र्यांनी महावितरण कार्यक्षेत्रात खासगीकरण होऊ देणार नाही, असे आश्वासन दिले होते.

त्यानंतरही मागील महिन्यात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महावितरण कार्यक्षेत्रातील ठाणे, वाशी, खारघर, उरण, भांडूप येथे अदानी इलेक्ट्रिसिटी व वसई, विरार, पालघर, मीरा भाईंदर, कल्याण, नागपूर, बारामती, दौंड, पुणे या क्षेत्रासाठी टोरेंट पॉवर यांचा अर्ज स्वीकारून अंतिम सुनावणीसाठी जाहीर सूचना प्रसिद्ध केली आहे. टाटा पॉवर यांनी महावितरणच्या कार्यक्षेत्रातील छत्रपती संभाजीनगर, वाळूज एमआयडीसी, बदनापूर, जालना येथे समांतर परवान्यासाठी अर्ज केला आहे. या धोरणाचा पुनर्विचार करावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

याआधीही अनेक शहरे विविध खासगी कंपन्यांना दिली होती; परंतु हाप्रयोग यशस्वी झाला नाही. आता समांतर वीज वितरण म्हणजे महावितरणच्या पायाभूत सुविधा व मालमत्तेचा वापर करून त्याच शहरात आणखी एक किंवा अनेक खासगी कंपन्यांना वितरणाची परवानगी देणे. हा घातक प्रकार असून, त्यातून खासगी कंपन्या महावितरणचे ग्राहक विविध आमिष देऊन आपल्याकडे खेचण्याचा जोरदार प्रयत्न करतील. वितरण कंपनीची यंत्रणा वापरून वितरण कंपनीलाच संपवतील, असे संघटनेने निवेदनात म्हटले आहे.

सर्वकर्मचाऱ्यांमध्येअस्वस्थता पसरली आहे. महावितरणची ३२९ उपकेंद्रे कंत्राटदारांना चालवण्यास देण्यासाठी काढलेली निविदा रद्द करावी. सर्व रिक्त पदे भरण्याचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर करावा, अशी मागणी महासंघाच्या वतीने अध्यक्ष विठ्ठल भालेराव व महामंत्री अरुण पिवळ यांनी केली आहे.त्या अनुषंगाने विज कामगार महासंघाने लातूर परिमडंळ कार्याल्यासमोर लातूर,धाराशिव, बिड येथील विज कर्मचाऱ्यांनी द्वार सभेच्या माध्यमातून खाजकीकरणाला विरोध करण्यात आला. यावेळी भारतीय मजूर संघाचे माजी जिल्हाध्यक्ष कमलाकर जाधव, भगवानराव पांचाळ, कामगार महासंघाचे कार्यसमिती सदस्य नारायणजी गडगडे , महावितरणचे संघटनमंत्री सुधाकर माने,लातूर झोनचे प्रभारी नजीर बागवान,झोन अध्यक्ष एन के बडे, झोन सचिव प्रवीण रत्नपारखी तसेच लातूर, बीड, धाराशिव या सर्कल मधील सर्व मंडळ व विभागीय पदाधिकारी व सभासद ऊपस्थित होते.

## नगररचना योजनेमध्ये बाधित झालेल्या विस्थापित धारकांना अर्ज करण्यासंबंधी मुदतवाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : पंढरपूर शहरातील नागरिकांना कळविण्यात येते की, जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय येथे दिनांक १ व २ मे २०२५ रोजी पंढरपूर शहरांमध्ये राबविण्यात येणाऱ्या विकास आराखड्या बाबत बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीत सन १९८२ मध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरामध्ये नगररचना योजना राबविण्यात आली होती. परंतु विस्थापित नगर येथे बाधित मालमत्ता धारक यांना प्लॉट मिळाले नाहीत. प्लॉटच्या खरेदी ही दिल्या नाहीत. अथवा आर्थिक मोबदला मिळाला नाही अशा अनेक तक्रारी बाधित नागरिकांनी केल्या होत्या. यास अनुसरून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी उपविभागीय अधिकारी,तथा प्रांताधिकारी श्री सचिन इथापे यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. नगररचना योजनेमध्ये ज्या बाधित मालमत्ता धारक यांना लाभ मिळाला नाही अशा मालमत्ता धारक यांनी आवश्यक त्या कागदपत्रासह अर्ज करणेस मुदत देण्यात आली होती. तथापि अजूनही कोणी विस्थापित नागरिक अर्ज करावयाचे राहिले असतील तर त्यांना पुन्हा अर्ज सादर करणेसाठी संधी देऊन मुदत वाढ करण्यात आलेली आहे. संबंधित नागरिकांनी दि. २६ जुलै २०२५ पर्यंत मुख्याधिकारी पंढरपूर नगरपरिषद यांच्याकडे अर्ज सादर करावेत. तसेच यापूर्वी अर्ज सादर केलेल्या विस्थापितांना अपुऱ्या कागदपत्राबाबत त्रुटीपत्र देण्यात आलेले आहे. त्यांनी त्रुटी पत्रानुसार आवश्यक कागदपत्रे मुख्याधिकारी नगरपरिषद पंढरपूर यांच्याकडे सादर करावेत असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी श्री सचिन इथापे यांनी केले आहे. जेणेकरून आलेल्या अर्जावर योग्य ती कार्यवाही करता येईल.